(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

क्र.पोमसं/३-अ/पदो- रापोनि/८५/२०१६.
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- ८ /०२/२०१७.

**वाचा:-** १. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१, व

२. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एस्आर्व्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/कार्या.१२, दिनांक २८/०४/२०१५, आणि अधिसूचना सुधारणा दि. १६/०७/२०१५.

## आदेश

उपरोक्त संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ ( न ) चे पोट कलम (२), त्याखालील सुधारीत स्पष्टीकरणानुसार, व उपरोक्त संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केलेल्या अधिसूचनांचे पालन करुन, पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, खालील नमूद केलेल्या राखीव पोलीस उपनिरीक्षकांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ४ मध्ये महसूली विभागाचे वाटप करण्यात आले असून, रकाना क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या घटकांत त्यांची राखीव पोलीस निरीक्षक पदावर **तात्पुरत्या स्वरूपात** कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून खालील अटींच्या अधिन राहून पदोन्नतीवर पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ.क्र | राखीव पोलीस उपनिरीक्षकाचे नांव | सध्याची नेमणूक | संदर्भ क्र. २ च्या तरतुदीनुसार वाटप करण्यात आलेला महसुली संवर्ग | राखीव पोलीस निरीक्षक पदावर तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या पदोन्नतीवरील नेमणूक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४. | ५. | ६. |
| १ | भगवान विजयराव टोणे | पो.प्र.केंद्र, सोलापूर | नाशिक - १ | पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे | रिक्त पदात |
| २ | घन:शाम जावलसिंग चव्हाण | नागपूर ग्रामीण | नागपूर -१ | पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर | रिक्त पदात |
| ३ | ठकाराम अमृत तांबडे | पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड | कोंकण - १ | बृहन्मुंबई आयुक्तालय | रिक्त पदात |

२. उपरोक्त राखीव पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा दिनांक त्याच दिवशी ह्या कार्यालयास कळवावा. तसेच, ते पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होताच, त्यांनी राखीव पोलीस निरीक्षकपदी कार्यभार स्विकारल्याचा दिनांक सुध्दा संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब ह्या कार्यालयास कळवावा.

३. सदर राखीव पोलीस उपनिरीक्षकांना देण्यात आलेली राखीव पोलीस निरीक्षक पदावरील <u>**तात्पुरती पदोन्नती**</u> ही खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे:-

**अ)** सदर पदोन्नती प्रथम ११ महिने, किंवा शासन, व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडून निवडसूचीस मान्यता मिळेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता असेल, व

**आ)** सदर तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधीत राखीव पोलीस उपनिरीक्षकांना नियमीत पदोन्नतीचे, व सेवाज्येष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत.

४. **वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या राखीव पोलीस उपनिरीक्षकांपैकी एखद्याविरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कारवाई केली असेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल, किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर, संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्याविरूध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास फॅक्सव्दारे तात्काळ पाठवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी.**

५. उपरोक्त आदेशांत नमूद केलेल्या ज्या राखीव पोलीस उपनिरीक्षकांविरूध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे, अथवा विभागीय चौकशीत निर्गमीत केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरू झालेली नाही, अशा राखीव पोलीस उपनिरीक्षकांकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदात भोगण्यास तयार असल्याबाबतचे त्यांच्याकडून दिनांकित स्वाक्षरी केलेले **लेखी हमीपत्र घेवून, व त्यास अधिन राहूनच** त्यांना पदोन्नतीवर सोडण्यात यावे. तसेच, संबंधीत राखीव पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नतीवर कार्यमुक्त केलेल्या आदेशांतही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशांची व त्यांच्या लेखी हमीपत्राची प्रत ह्या कार्यालयातील कार्यासन अधिकारी, १) का.क्र.३-अ २) का.क्र. ११ व ३) का.क्र.११-अ यांना स्वतंत्रपणे लक्षवेध करून, न चुकता सादर करावी. तसेच, त्याची प्रत संबंधीत राखीव पोलीस उपनिरीक्षक ज्या घटकात आता पदोन्नतीवर हजर होणार आहेत, त्या घटकप्रमुखांना देखील न चुकता पाठवावी. तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्र.३-अ यांना लक्षवेध करून सादर करावा.

६. **उपरोक्त आदेशांमधील राखीव पोलीस उपनिरीक्षक जर मागास प्रवर्गातील असतील तर, त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी झालेली असल्याची खातरजमा करावी. उपरोक्त आदेशांतील ज्या मागासवर्गीय पोलीस अधिकाऱ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल, त्यांचेकडून ते प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही संबंधीत घटकप्रमुखांनी करावी; तोपर्यंत त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करु नये.**

७. राखीव पोलीस उपनिरीक्षक ते राखीव पोलीस निरीक्षक पदावर देण्यात येणाऱ्या सर्व पदोन्नती मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठापुढील दाखल याचिका क्र. २७९७/२०१५ व याचिका क्र. ४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या अधिनस्त राहून देण्यात येत आहे.

८. राखीव पोलीस उपनिरीक्षकांना राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीवरील पदस्थापना, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एस्आर्व्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या.१२, दिनांक २८/०४/२०१५ व अधिसूचना सुधारणा दि. १६/०७/२०१५ मधील तरतुदीनुसार देण्यात आलेली आहे

९. शासन पत्र, गृहविभाग, क्र.पीएम्एन्-०१०८/प्र.क्र.८८३/पोल ५ ब, दि.२९/७/२००८ मध्ये नमूद केल्यानुसार, शासन निर्णय, गृहविभाग, क्र.पीएम्एन्-०२९७/सीआर्-४७४/पोल-५ ब, दि.२६/२/२००४ अन्वये महाराष्ट्र पोलीस दलातील त्यावेळी राजपत्रीत "गट ब" असलेल्या पोलीस निरीक्षक पदाचा दर्जा वाढवून ते पद "गट अ" चे करण्यात आले आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-३२० नुसार राज्य शासनाच्या सेवेतील सर्व राजपत्रीत पदें लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येतात. याबाबत, आयोगास पाठविण्यात येणाऱ्या प्रस्तावास मिळणाऱ्या मंजुरीच्या अधिन राहून सदर पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१०. **तसेच, शासन पत्र, गृहविभाग, क्र.पीएम्एन्-०१०८/प्र.क्र.१३४/पोल-५ ब, दि.२२/१०/२००८ अन्वये पोलीस निरीक्षकांपर्यंतच्या राजपत्रीत पदावरील पदोन्नती नियमित करण्याबाबतच्या आदेशांना शासन मान्यतेच्या अधिन राहून पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.**

**११.** सदर पदोन्नती आदेशांमधील राखीव पोलीस उपनिरीक्षक हे जर ओदशांमध्ये नमूद केलेल्या घटकांमध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते **ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटकप्रमुखांनी** त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे ह्या कार्यालयास न चुकता कळवावे.

१२. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH या शिर्षाखाली देखील उपलब्ध होतील.

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह),
पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर / नानवीज-दौंड / धुळे / नागपूर

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथकें, म.रा.,मुंबई

प्रत सविनय सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग,
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

प्रत सस्नेह,

महालेखाकार-१ महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखाकार-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर / सोलापूर / पुणे / धुळे

प्रत:-

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई (सदर आदेश संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२/ ५-अ / ४०

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता